# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२३-२३** **दिनांक :- १३/०७/२०२३**

**वाहन,घरफोडी चोरी करणाऱ्या सराईत अरोपीतास अटक करुन ३ गुन्हयांची उकल.**
**वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

वालीव पोलीस ठाण्याचे हददीत दिनांक ३०/०६/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा.चे सुमारास फिर्यादी हे राहत असलेल्या मौर्या चाळ, गवराईपाडा, जिव ननगर, वसई पुर्व येथील रुमच्या उघडया दरवाज्यावाटे दोन अनोळखी इसमांनी घरात प्रवेश करुन ५,०००/- रुपये किंमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल चोरुन नेलेबाबत फिर्याद दिल्याने वालीव पोलीस ठाणेत गुन्हा नोंद क्र. I ५७२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे अरविंद महेश प्रजापती, रा. रुम नं. ८, शिवकुमार चाळ, चौधरी कम्पाऊंड, अण्णाडीस, संतोषभुवन, नालासोपारा पुर्व यास अटक करुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील आणखी २ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हयातील चोरीस केलेली मोटारसायकल, सिलेंडर बाटला, मोबाईल असा एकुण ३१,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्हे उघडकिस करण्यात यश आले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | गुन्हा.रजि.नं. ५७२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ३४ प्रमाणे |
| २. | वालीव | गुन्हा.रजि.नं. ५१३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ३८०, ३४ प्रमाणे |
| ३. | वालीव | गुन्हा.रजि.नं. १७२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ प्रमाणे |

सदरची कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौगुले- श्रींगी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्री. विनायक नरळे सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी केली आहे.

**-----0000------**